## प्रेस नोट

**दिनांक २८/०८/२०२१**

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) सौ.सोनाली संजय पिल्हारे, वय ३६ वर्ष, पद– सरपंच, जळका पटाचे रा.जळका पटाचे ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती.<br>२) श्री.संजय पिल्हारे, वय ३६ वर्ष, धंदा– ऑटो चालक, रा.जळका पटाचे ता.धामणगाव रेल्वे जि. अमरावती. (खाजगी व्यक्ती) (सरपंच श्रीमती सोनाली पिल्हारे यांचे पती)<br>३) श्री.विजय पिल्हारे, वय ३९ वर्ष, धंदा– शेती, रा. जळका पटाचे ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती. (खाजगी व्यक्ती) (सरपंच श्रीमती सोनाली पिल्हारे यांचे भासरे) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक १८/०८/२०२१ व दिनांक १९/०८/२०२१ रोजी |
| ४ | मागणी केलेली रक्कम | १,५००/–रु. |
| ५ | घटनास्थळ | ईआलोसे यांचे राहते घर जळका पटाचे ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती. |

यातील तक्रारदार यांनी दि.१७/०८/२०२१ रोजी लाचलुचपत कार्यालय अमरावती येथे येवुन त्यांनी ग्रामपंचायत जळका पटाचे अंतर्गत तार कंम्पाउंड (चेन लिंक बांधकाम), नालीचे काम, हौदाचे काम इत्यादी कामकाज मार्च २०२१ मध्ये पुर्ण केलेले असुन सदर केलेल्या कामाच्या मजुरीचा सेंट्रल बॅकेचा चेक (२२,७००/–रू) तक्रारदार यांचे नावाने मंजुर झालेला असुन सदर चेक वर ग्रामपंचायत सचिव श्री आडे यांची सही झालेली असुन सरपंच श्रीमती सोनाली पिल्हारे यांची सही आवश्यक असल्याने तक्रारदार यांनी सदर कामासंबधाने ग्रामपंचायत जळका पटाचे येथील सरपंच श्रीमती सोनाली पिल्हारे या सदर चेक वर सही करण्यासाठी १,५००/– रू. लाचेची मागणी करत असल्याबाबत तक्रार दिली.

सदर तक्रारीची दि.१८/०८/२०२१ व दि.१९/०८/२०२१ रोजी शासकिय पंचासमक्ष पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान ग्रामपंचायत जळका पटाचे येथील सरपंच श्रीमती सोनाली पिल्हारे यांनी तक्रारदार यांना त्यांनी ग्रामपंचायत जळका पटाचे केलेल्या कामाच्या (मजुरी) चेक वर सही करण्यासाठी १,५००/– रू. लाचेची मागणी केली. तसेच श्री.संजय पिल्हारे (सरपंच श्रीमती सोनाली पिल्हारे यांचे पती) व श्री.विजय पिल्हारे (सरपंच श्रीमती सोनाली पिल्हारे यांचे भासरे) यांनी तक्रारदार यांच्या कडील चेक स्वत: जवळ ठेवुन घेवुन सदर चेकवर सरपंच मॅडम यांची सही घेवुन देण्यासाठी लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केला त्यावरून ईआलोसे श्रीमती सोनाली पिल्हारे, खाजगी व्यक्ती श्री.संजय पिल्हारे व श्री.विजय पिल्हारे यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरूण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती व श्री.संतोष इंगळे, पोलीस निरिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस निरीक्षक अमोल कडु, म.पो.ह. माधुरी साबळे, ना.पो.कॉ. विनोद कुजांम, पो.कॉ.शैलेश कडु, पो.कॉ.निलेश महिंगे चालक सपोउपनि.सतिश किटुकले व प्रदिप बारबुध्दे यांनी पार पाडली. नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

मोबाईल क. – ९४२०९३०५५५ ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५, २५५३०५५
टोल फ्रि नंबर –१०६४.

(अमोल वि. कडु)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती

Scanned with CamScanner